# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/08/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा उंद्री शिवार येथे दिनांक १३/०८/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– मोनु ठोठई यादव, वय ३६ वर्ष, रा. लखीमा ता. कप्तानगंज जि. काशीनगर उत्तर प्रदेश हा कुही फाटा ते कुही रोडने जात असतांना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक देवून गंभिर जखमी केल्याने त्यास उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता त्याचा उपचारादरम्यान मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जोगिंदर भुलई यादव, वय ४६ वर्ष, रा. रमाईनगर नारी नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोनकुसरे पोस्टे कुही हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील कन्हान एम जी नगर कुसाजी नगर रेल्वे क्रॉसींगच्या बाजूला दिनांक १५/०८/२०२३ चे २०.०० वा. २०.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अब्बास अशोक खडसे, वय ३९ वर्ष, रा. कन्हान एम जी नगर कुसाजी नगर रेल्वे क्रॉसींग च्या बाजूला व आरोपी नामे– १) अभय खडसे २) सलमान खडसे दोन्ही रा. कन्हान एम. जी. नगर कुसाजी नगर रेल्वे क्रॉसींगच्या बाजूला हे सख्खे भाऊ असून शेजारी राहतात. यातील फिर्यादी हा आपले घरी हजर असता यातील आरोपी याने फिर्यादी यास म्हटले की तुझ्या छताचे पाणी आमच्या घरात पडत आहे या कारणावरून झगडा भांडण केले व फिर्यादीचे मुली सोबत सुध्दा झगडा भांडण करून काठीने मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एएसआय गणेश पाल ब. नं. ३६० मो. क्र. ९५५२५१२६८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला :**— अंतर्गत सालई भट्टी येथे दिनांक १४/०८/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. शालु सचिन किरमरे, वय ३० वर्ष, रा. वडगाव बेला ता. उमरेड जि. नागपुर व आरोपी नामे— सचिन किरमरे, वय ३७ वर्ष, रा. सालईभट्टी ता. भिवापूर हे पती पत्नी असुन यातील फिर्यादीचा मुलगा/जखमी नामे —विराज किरमरे, वय १२ वर्ष यास आरोपीने आधारकार्ड पाहायला लावले आधारकार्ड मिळून न आल्याने आरोपीने रागाच्या भरात तुराटीच्या काठीने डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार निलेश बिजवाड पोस्टे बेला हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**